प्रशिक्षक विवेक मालशे यांचे यश अभिमानास्पद

e Paper



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 13/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 264 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रशासनात ताकद - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : समाजातील शेवटच्या घटकाचे कल्याण हे ध्येय ठेवत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे. त्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेचा उपयोग करावा. राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.**



प्रशासनात आलेल्या तुकडीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित व जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.२०२४ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी वर्षा निवासस्थानी संवाद साधला.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी उपस्थित होते.संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी विकास केंद्रित प्रशासन गरजेचे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे नागरी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.संतुलित व सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी शासन १०० सुधारणा करीत आहे. या सुधारणांसाठी ‘ वॉर रूम’ तयार करण्यात आली आहे. महसूल सुधारणांसाठी सल्लागार नेमण्यापेक्षा प्रशासनातील दांडगा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा खूप चांगला परिणाम दिसून येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.शासनाने औद्योगिक प्रयोजनासाठी राज्यामध्ये अकृषक परवाना काढण्याची मोठी सुधारणा नुकतीच केली आहे. वेळखाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया दूर करीत राज्यात गतिमान प्रशासन देण्यावर शासनाचा भर आहे. महसूल विभाग अंतर्गत बरीच प्रक्रिया, सेवा ब्लॉक चेन पद्धतीवर आणण्यात येत आहे. त्यामुळे बऱ्याच प्रक्रिया जलद व अचूक होत आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संपूर्ण प्रशासकीय धोरणे, प्रक्रिया यांचे ‘ व्हिजिट’ करून ‘ रिइंजिनिअरिंग’ करण्यासाठी शासनाने १५० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. या माध्यमातून बऱ्याच सुधारणा करण्यात येत आहेत. राज्यात सार्वत्रिक औद्योगिक विकास होण्यासाठी गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. मुंबई, पुणे प्रमाणेच छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक यासह राज्यात अन्य भागात नवीन औद्योगिक पट्टे निर्माण करण्यात येत आहे. विदर्भामध्ये नागपूर – अमरावती औद्योगिक विकासाचा पट्टा तयार होत आहे. अमरावतीमध्ये पीएम मित्रा पार्क तसेच वस्त्रोद्योग पार्कमुळे औद्योगिक विकासाची परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. त्याचा परिणाम म्हणून अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीत आज एकही भूखंड शिल्लक राहिलेला नाही. अमरावती विमानतळ नागरी वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहे. या ठिकाणी एअर इंडियाच्यावतीने आशिया खंडातील सर्वात मोठे ‘पायलट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट’ उभारण्यात येत आहे.

# अजित पवारांचे पुण्यात ‘मिशन 165’

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : आगामी पुणे महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीसाठी भाजपकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचे लक्षात आल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील सवगड्यांना १६५ जागांवर तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. भाजपकडूनही इच्छुकांशी बोलणी सुरू झाल्याने महापालिकेत महायुतीची शक्यता मावळल्यासारखी स्थिती आहे.



त्यामुळे ‘मिशन १६५’साठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून जुळवाजुळव करण्यास वेग आला आहे. अजित पवार यांच्या पुण्यातील शिलेदारांकडून भाजपमधील नाराजांच्या गुप्त गाठीभेटी सुरू झाल्या आहेत.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या कंपनीच्या जमीन व्यवहार प्रकरणानंतर अजित पवार यांना विरोधी पक्ष लक्ष्य करत असतानाही पवार यांनी गेल्या शनिवारी दिवसभर शहर कार्यालयात पदाधिकाऱ्यांशी चर्चा, इच्छुकांच्या मुलाखती घेत जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा आढावा घेतला. पुण्यातील पदाधिकाऱ्यांची मुंबई येथे गेल्या महिन्यात बैठक घेण्यात आली.

त्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पदाधिकाऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला होता. भाजपकडून महायुती म्हणून लढण्यास प्रतिसाद मिळण्याच्या प्रतीक्षेत अजित पवार यांची ‘राष्ट्रवादी’ आहे.

गेल्या शनिवारी झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी भाजपकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याची बाब अजित पवार यांच्या निदर्शनास आणून दिली.भाजपकडून स्वबळावर लढण्याच्या दृष्टीने इच्छुकांशी बोलणी सुरू केली आहे. शिवाय भाजपने ‘मिशन १२५’चा नारा दिला आहे. त्यामुळे महापालिकेत युतीची शक्यता मावळल्यासारखी स्थिती आहे.

त्यामुळे अजित पवार यांनी त्यांच्या पुण्यातील सवंगड्यांना महापालिकेतील सर्व १६५ जागांसाठी तयारीला लागण्याचे आदेश दिले असल्याचे काही पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.अजित पवार यांनी स्वबळावर लढण्याबाबतचे संकेतही दिले आहेत.

महाविकास आघाडीत असताना तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) हे पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्वबळावर लढत असत, ही बाबत पवार यांनी स्पष्ट केली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 13/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# एमआयटी एडीटी आणि ॲडमिशन सजेशन आयोजित करिअर गायडन्स सेमिनार संपन्न

## पिंपरी चिंचवड शहरातील शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे आणि ॲडमिशन सजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'बारावी नंतर पुढे काय?' या विषयावर मोफत करिअर गायडन्स सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारला विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा तसेच पालकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. तसेच या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरातील तज्ञ शिक्षकांना 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.**




या सेमिनार मध्ये विद्यार्थ्यांना एमआयटी एडीटी विद्यापीठाचे विद्यार्थी कार्य चे सहाय्यक संचालक डॉ. उल्हास माळवदे व सहाय्यक प्राध्यापक डॉ. नंदकिशोर कार्लेकर आणि ॲडमिशन सजेशनचे संचालक अक्षय कुमार भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले. बारावी नंतर पुढे काय? या विषयावर मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी येथे संपन्न झाला. यावेळी विविध कोचिंग क्लासेसचे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वेळेचे नियोजन करून अभ्यास करा : माळवदे**

यावेळी डॉ. उल्हास माळवदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बारावी नंतर पुढे काय? याबद्दल माहिती देत बारावी नंतर विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगत विविध अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठात ॲडमिशनसाठी असलेले निकष यावेळी समजून सांगितले. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करियर करून नावलौकिक मिळवावे. तुम्ही वेळेचे नियोजन करून अभ्यास करा, यामुळे चांगले गुण मिळवण्यास मदत होईल. त्याचप्रमाणात अभ्यास करताना रिव्हिजन सुरु ठेवा. काही विद्यार्थी परीक्षेच्या एक दिवस अगोदर रिव्हिजन करतात, मात्र तुम्ही पाहा, जे टॉपर विद्यार्थी आहेत, त्यांची अभ्यास करण्याची पद्धत आणि आपली पद्धत कशी आहे. तसेच विद्यार्थ्यांनी बारावी नंतर कोणते अभ्यासक्रम निवडावे? कोणते महाविद्यालय निवडावे? या बद्दल माहिती देत प्रवेश परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना माळवडे यांनी काही सोप्या पद्धतीने स्टेप नुसार विद्यार्थ्यांना समजून सांगितले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरे करीत आप-आपली समस्या मांडली, या समस्येचे निवारण उल्हास माळवदे यांनी केले.

**ज्या गोष्टींची आवड असेल तर तीच दिशा निवडा : कार्लेकर**

यावेळी बोलताना डॉ. नंदकिशोर कार्लेकर म्हणाले, "तुम्ही तुमच्या करिअरचा मार्ग ठरवत असताना काही गोष्टी लक्षात ठेवा, मशीन कसे शिकतात, डेटा निर्णय कसा बदलतो किंवा मोबाइल ॲप्स लोकांचे जीवन कसे सुलभ करतात, या गोष्टींची आवड असेल तर तीच दिशा निवडा. स्पेशलायझेशन करा म्हणजे तुमच्या आवडीला दिशा द्या, ज्यात तुमची आवड असेल, तीच दिशा निवडा, याने तुमच्या करियरला योग्य वळण मिळेल. प्रगत तंत्रज्ञान शिकण्यापूर्वी गणित, भौतिकशास्त्र आणि कोअर प्रोग्रॅमिंग या विषयांमध्ये तुमचा पाया मजबूत असावा. फक्त आजची नोकरी नव्हे, तर दीर्घकालीन दृष्टी ठेवा: आज जे तंत्रज्ञान शिकत आहात (AI, Edge Computing, Blockchain) ते पुढील दशकात जगाच्या मूलभूत प्रणालीचा भाग होणार आहे. म्हणून तुमचा करिअर फक्त 2025 साठी नव्हे, तर भविष्यासाठी घडवा. सतत शिकत राहा: तंत्रज्ञान सतत बदलत असते. पहिल्या वर्षी शिकलेले तिसऱ्या वर्षी बदलू शकते. त्यामुळे सतत शिकण्याची वृत्ती ठेवा. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत संशोधन सुविधा, उद्योग सहकार्य, मार्गदर्शन व प्लेसमेंट सहाय्य या गोष्टी देखील महत्त्वाच्या आहेत आणि एमआयटी एडीटी या बाबतीत सक्षम असल्याचे म्हंटले आहे.

**कौन्सिलिंग म्हणजे फॉर्म फिलिंग न्हवे : भंडारी**

पुढे मार्गदर्शन करताना अक्षयकुमार भंडारी यांनी सीईटी आणि जेईई अभ्यासक्रमाबद्दल माहिती संपूर्ण प्रवेशप्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. सीईटी आणि जेईई अभ्यासक्रम अंतर्गत कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा आणि ते कसे निवडायचे? याबाबत माहिती दिली. यावेळी त्यांनी इंजिनीरिंग अभ्यासक्रम संदर्भात प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच जेईई अभ्यासक्रमात कोणकोणत्या गोष्टी महत्वाच्या असल्याचे सांगितले.

यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्याला येणाऱ्या अभ्यासाविषयी समस्या संदर्भात मान्यवरांना प्रश्न उत्तरे करत आपापल्या समस्याचे निराकरण करून घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरिता ॲडमिशन सजेशनचे आकाश भंडारी, संदेश भंडारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमराज नाडे यांनी केले तर आभार अक्षय भंडारी यांनी व्यक्त केले.

### शहरातील शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान

"याप्रसंगी पिंपरी चिंचवड शहरातील तज्ञ शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये चिंचवड येथील चाटे कोचिंग क्लासचे संचालक प्रा. विजय बोबडे सर, ओम फिनिक्स कोचिंग क्लासेसच्या संचालिका फुंदे मॅडम, निगडी-रावेत येथील चाटे कोचिंग क्लासचे संचालक सावंत डीजे, ओमकार मॅथ अकॅडमी संचालक वाळुंज सर, थेरगाव येथील चाटे कोचिंग क्लासेस चे प्राध्यापक सचिन निंजवते, साने चौक येथील ओम फिनिक्स कोचिंग क्लासेस चे घोंगडे सर तसेच निगडी येथील ओम फिनिक्स कोचिंग क्लासचे नितेश शिरसाठ यांचा गुरु गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आप-आपले मनोगत व्यक्त केले."

# राष्ट्रवादीची उमेदवारी अर्ज मागविण्याची प्रक्रिया 14 नोव्हेंबर पासून सुरु

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२०२६ करिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी चिंचवड शहर जिल्हाच्या वतीने ३२ प्रभागातील इच्छुक उमेदवारांनी शुक्रवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ ते मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० या वेळेत राष्ट्रवादी पक्ष कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे संपूर्ण माहितीसह अर्ज पक्ष कार्यालयात जमा करावेत.

अर्जासोबत उमेदवारांनी आपली माहिती देताना अर्जदाराचे संपूर्ण नाव, विधानसभेचे नाव, प्रभागाचे नाव, प्रभाग क्रमांक, मतदार यादीतील भाग व अनुक्रमांक, आरक्षण प्रवर्ग (ओपन, ओबीसी, एस.सी.,एस.टी), जात वैधता प्रमाणपत्र छायांकित प्रत, जन्म दिनांक, वय, शिक्षण, आधार कार्ड, पक्षाचा क्रियाशील व प्राथमिक सदस्य क्रमांक इत्यादींसह आपला कार्य अहवाल जोडने आवश्यक आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 13/11/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# मोरया हॉस्पिटलतर्फे 300 यशस्वी कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रियांचा गौरव सोहळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड – अश्विन मेडिकल फाऊंडेशनच्या मोरया मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे ३०० यशस्वी कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया पूर्ण झाल्याचा उत्सव सोहळा रविवारी, दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.४५ वाजता रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे आयोजित करण्यात आला आहे.**



या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार शंकरभाऊ जगताप असतील. विशेष उपस्थिती म्हणून चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, दिलीप सोनिगरा ज्वेलर्सचे प्रमुख दिलीप सोनिगरा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघाचालक विनोद बन्सल, तसेच औंध जिल्हा रुग्णालयातील सिविल सर्जन डॉ. नागनाथ यमपल्ले उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आज मोरया हॉस्पिटलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत हॉस्पिटलचे कार्यकारी विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर यांनी सविस्तर माहिती दिली. त्यावेळी रुग्णालयाच्या प्रशासन अधिकारी सारिका मोरे, कर्मचारी प्रतिनिधी विश्वस्त भगवान तांबे व सामाजिक कार्यकर्ते संजय कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, “कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया म्हणजे विज्ञान, करुणा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम आहे. या शस्त्रक्रियेद्वारे जन्मतः कर्णबधिर असलेल्या मुलांना पुन्हा ऐकण्याची आणि बोलण्याची क्षमता प्राप्त होते. जन्मतः कर्णबधिर असणाऱ्या मुलांचे प्रमाण 1000 मुलांमध्ये दोन ते चार इतके असते.”मोरया हॉस्पिटल हे महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यांतील कर्णबधिर मुलांसाठी आशेचा किरण ठरले आहे. या शस्त्रक्रियेचा खर्च सुमारे ८ ते ९ लाख रुपयांपर्यंत जातो. मात्र, अनेक गरजू पालकांना तो परवडत नसल्याने प्रशासन, हॉस्पिटल, विविध देणगीदार आणि सरकारी योजनांच्या मदतीने अशा मुलांना पुन्हा ऐकण्याच्या जगात आणले जात आहे. अलीकडेच परसिस्टंट फाउंडेशन, फिनोलेक्स केबल्स, लायन्स क्लब, रोटरी क्लब, केएसबी पंप्स, मुकुल माधव फाउंडेशन, रमा पुरुषोत्तम फाउंडेशन, पंचशील फाउंडेशन, वनाज फाउंडेशन या आगळ्या-वेगळ्या सामाजिक प्रकल्पाची दखल घेत मुलांच्या ऑपरेशनसाठी आर्थिक मदत केली. डॉ. अविनाश वाचासुंदर व डॉ. अक्षय वाचासुंदर (एम.एस. ईएनटी) यांनी आतापर्यंत ३०० हून अधिक कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत.त्यांनी सांगितले की, “श्रवणदोष असलेल्या मुलांवर सातत्याने आणि संयमाने काम करावे लागते. E N T सर्जन, ऑडियोलॉजिस्ट, स्पीच थेरपिस्ट, सायकॉलॉजिस्ट, स्पेशल एज्युकेटर आणि पालक यांच्या समन्वयातूनच हे यश मिळते. आमच्या हॉस्पिटलमधील टीमवर्कमुळे अनेक मुले आज पुन्हा ऐकू व बोलू शकत आहेत, हीच आमच्यासाठी मोठी समाधानाची गोष्ट आहे.”सध्या मोरया हॉस्पिटलमध्ये सुमारे २० मुलांना वाचा-भाषा प्रशिक्षण दिले जात आहे. प्रत्येक मुलासाठी स्वतंत्र स्पेशल टीचर नेमण्यात आली असून, शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसनासाठी सातत्याने मार्गदर्शन केले जाते.पालकांचा अनुभवही यासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

नांदेडच्या सौ. कविता कुरुळे यांनी सांगितले की, “माझ्या दोन वर्षांच्या मुली ‘रुही’ला ऐकू येत नव्हते. मोरया हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी प्रेमळपणे सर्व सांगितले आणि देणगीदारांच्या मदतीने तिचे ऑपरेशन केले. आज ती आमच्या बोलण्याला प्रतिसाद देते.

‘आई’, ‘बाबा’ म्हणते, हे आमच्यासाठी स्वप्नवत आनंद आहे.”डॉ. अविनाश वाचासुंदर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पात हॉस्पिटलचा संपूर्ण स्टाफ – ऑडिओलॉजी, ओटी, रिसेप्शन, वॉर्ड, बिलिंग, सर्जन डॉक्टर, कोऑर्डिनेटर्स आणि वाचा-भाषा शिक्षक – सर्वजण समन्वयाने काम करत आहेत.

कॉक्लिअर इम्प्लांट ही अत्यंत गुंतागुंतीची पण जीवन बदलवणारी शस्त्रक्रिया असून, मोरया हॉस्पिटल चिंचवड येथे ती अत्यंत कुशलतेने केली जाते. या यशस्वी वाटचालीच्या ३०० शस्त्रक्रियांचा उत्सव सोहळा म्हणजे केवळ हॉस्पिटलचा नव्हे, तर अनेक कर्णबधिर मुलांना नवजीवन देणाऱ्या संवेदनशील कार्याचा गौरव आहे.

# पीसीसीओइआर मध्ये विद्यार्थ्यांनी साजरा केला हॅलोविन उत्सव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीइटी) च्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओइआर) येथे इंटरनॅशनल रिलेशन्स सेल आणि एसीएम - डब्ल्यु यांच्या सहकार्याने दिवाळी निमित्ताने "ट्रेक ऑर ट्रिट हॅलोविन" उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन पीसीसीओईआर चे संचालक डॉ. हरीश तिवारी यांनी केले. जागतिक संस्कृती ची देवाण घेवाण करणारा हा उपक्रम महाविद्यालयातील आंतरराष्ट्रीय विभागाने साजरा केला. या कार्यक्रमात हॅलोवीन ट्रेक ट्रिव्हिया, ग्लिच द लूक कॉस्च्युम कॉन्टेस्ट आणि द हॉन्टेड हंट फॉर द हॉन्टेड हंट यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून ही पार्टी थ्रिलर, रोमांचक झाली होती. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक तसेच त्यांचे कुटुंबीय यांनी सहभाग घेतला होता.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 13/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# प्रशिक्षक विवेक मालशे यांचे यश अभिमानास्पद

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते सत्कार



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : नवी दिल्ली येथे इंडीयन डेफ क्रिकेट असोसिएशन (आयडीसीए) तर्फे ९ व्या टी-२० राष्ट्रीय डेफ क्रिकेट चॅम्पियनशीप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र मूकबधिर क्रिकेट संघाने जम्मू काश्मीर मूकबधिर क्रिकेट संघाचा ८ धावांनी पराभव करत विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाचे भांडारपाल विवेक मालशे मोलाचा वाट उचलला.**

या स्पर्धेत प्रशिक्षक या नात्याने मिळविलेल्या यशाबद्दल विवेक मालशे याचा अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी संघाचे खेळाडू राहूल चावरिया, सचिन लोणे, महेश कुदळे, ओंकार पवार, विनोद साळूंखे, कृष्णा चव्हाण, योगेश साठे, निखिल आव्हाड, विजय बंडवाल, आकाश नामदे आदी उपस्थित होते.यावेळी अतिरिक्त आयुक्त खोराटे विवेक मालशे यांनी प्रशिक्षक म्हणून महाराष्ट्र संघाला विजय मिळवून दिल्याबद्दल यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. याप्रसंगी बोलताना खोराटे म्हणाले की मालशे यांनी यापूर्वी भारतीय मूकबधिर क्रिकेट संघाचे कर्णधार म्हणून संघाला विजेतेपद मिळवून दिले आहे. मालशे यांच्या या सातत्यपूर्ण कामगिरी पिंपरी चिंचवड शहरासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. यातून मूकबधिर खेळाडूंना नक्कीच प्रेरणा मिळेल. तसेच, पुढील वर्षी दुबई येथे होणाऱ्या मूकबधिर विश्वचषक स्पर्धेसाठी प्रशिक्षकपदासाठी देखील अतिरिक्त आयुक्त खोराटे मालशे यांना शुभेच्छा दिल्या.इंडीयन डेफ क्रिकेट असोसिएशन (आयडीसीए) च्या वतीने दि ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२५ या कालावधी दरम्यान ९ व्या टी-२० राष्ट्रीय मूकबधिर क्रिकेट चॅम्पियनशीप टुर्नामिंटचे नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये देशभरातील एकूण २० संघानी भाग घेतलेला होता. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र मूकबधिर क्रिकेट संघाचे प्रशिक्षक म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाचे भांडारपाल विवेक मालशे यांची निवड करण्यात आली होती.दिल्ली येथे पार पडत असलेल्या एकूण ७ दिवसांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये अंतिम सामन्यात महाराष्ट्र डेफ क्रिकेट संघाने जम्मू काश्मीर डेफ क्रिकेट संघाचा ८ धावांनी पराभव करुन ९ व्या राष्ट्रीय टी-२० मूकबधिर क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. विवेक मालशे यांच्या तांत्रिक मार्गदर्शन, परिश्रम व संघभावनेच्या जोरावर महाराष्ट्र मूकबधिर क्रिकेट संघाने अंतिम सामन्याविजय मिळविला.प्रशिक्षक म्हणून महाराष्ट्र संघाला विजय मिळवून दिल्याबद्दल विवेक मालशे यांचा महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील, सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे तसेच विशेष अधिकारी किरण गायकवाड आदींनी अभिनंदन केले.

# महानगरपालिकेच्या शाश्वत विकासकामांचा जागतिक पातळीवर सन्मान

## बार्सिलोना येथे झालेल्या 'स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड कॉंग्रेस 2025' मध्ये सहभाग




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख मजबूत केली आहे. स्पेनमधील बार्सिलोना येथे ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या 'स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड कॉंग्रेस २०२५' दरम्यान आयोजित 'आंतरराष्ट्रीय शहरी आणि प्रादेशिक सहकार्य (IURC) ग्लोबल थीमॅटिक नेटवर्किंग कार्यशाळेत' सहभागी होण्यासाठी भारतातील सहा पायलट शहरांपैकी एक म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला आमंत्रित करण्यात आले होते.**

सदर कार्यशाळेत मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि सहशहर अभियंता बापू गायकवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व केले. शहरी गतिशीलता, हवामान बदलास अनुरूप नियोजन, आणि शाश्वत वाहतूक यांसारख्या विषयांवर केंद्रित सत्रांमध्ये त्यांनी जगभरातील शहर प्रतिनिधींशी अनुभव आणि कल्पनांची देवाणघेवाण केली.या कार्यशाळेदरम्यान ल्यूवेन, हॅम्बुर्ग आणि व्हिक्टोरिया यांसारख्या शहरांसोबत 'वेस्ट-टू-एनर्जी', 'हरित वाहतूक प्रणाली' आणि 'स्मार्ट शहरी उपाय' या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चांमधून जगातील अनेक शहरे पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी नवोपक्रम आणि भागीदारीच्या माध्यमातून कसे प्रयत्नशील आहेत याची महत्त्वपूर्ण माहिती
मिळाली.महानगरपालिका सध्या हवामान अनुकूल विकास, हरित गतिशीलता, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवित आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून महानगरपालिका जागतिक पातळीवरील सर्वोत्तम शहरी धोरणे आत्मसात करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील हा सहभाग पिंपरी चिंचवड शहरासाठी एक मोठी उपलब्धी असून, महानगरपालिका जागतिक दर्जाच्या शाश्वत आणि स्मार्ट शहरांच्या यादीत स्वतःची ओळख अधिक दृढ करत आहे.

> "बार्सिलोना येथे झालेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सहभाग म्हणजे आपल्या शहराच्या प्रगत आणि शाश्वत विकास दृष्टिकोनाची जागतिक स्तरावरची दखल आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, हरित वाहतूक आणि नागरिकाभिमुख धोरणांच्या माध्यमातून आम्ही जागतिक दर्जाचे, राहण्यायोग्य आणि भविष्याभिमुख शहर उभारण्याच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहोत."
>
> **श्रावण हर्डीकर**
> आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे
मे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734